## "आस्वाद"

पाण्यात मनसोक्त भिजायचे
दोघांनी मिळून रानावनात फिरायचे ----

कोणत्या झाडावर हिरवी नव्हाळी
कोणत्या वेलीवर पाचूची झळाळी
पानाफुलांनी लता वृक्षांची बहरली डहाळी
हिरव्या पाऊलवाटेवरून जपूनी चालायचे
ऋतूंचे वैभव डोळ्यात साठवायचे ॥१॥ ----

रंगीबेरंगी फुलांचे झेले सकौतुके उमलले
निर्झरांच्या तुषारांनी हृदयीचे अंतरंग ओळखले
चांदण्यांच्या संगतीत गुज सृष्टीचे उलगडले
शर्यत ढगांशी लावतांना पुढे पुढेच धावायचे
सान्निध्यात वसुंधरेच्या तनामनाने बहरायचे ॥२॥ ---

जंगल घनदाट, नदीचा मोहक घाट
पक्ष्या मधाळाची, नागमोडी पायवाट
लेण्याद्रीचा कातीव कोरीव शिल्पाचा थाट
डोळे भरून बघतांना सगळे कांही विसरायचे
हातात हात घेवूनी आवडीचे गीत गुणगुणायचे ॥३॥ ----

मुक्तहस्ते वनदेवीने केला खजिना खुला
वडाच्या पारंब्याचा वरखाली झुलतो झुला
नंदनवन धरेवर अवतरला हवे काय मला-तुला
इवल्या इवल्या गोष्टीतून सुख असेच शोधायचे
संसारात एकमेकांना प्रेमाने हळूवार जपायचे ॥४॥

सौ विजया पुरुषोत्तम जोशी.